ePaper

झारखंडमधील काँग्रेस आमदाराविरोधात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™




पान 3 वरुन...

स्वीकृत नगरसेवक निवडीचा तिढा सुटणार?

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 15 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




# भारताने पाकला पुन्हा हरवलं!

## अंडर-१९ अंतिम सामन्यात एका विकेटने विजय; भारताने पटकावले जेतेपद

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारताच्या अंडर-१९ संघाने रोमहर्षक सामन्यात पाकिस्तान संघावर एका विकेटने दणदणीत विजय मिळवला. भारताला अखेरच्या चेंडूत ३ धावांची गरज असताना गोलंदाज मोहित उल्वाने दणदणीत चौकार मारला आणि टीम इंडियाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. लक्ष्य रायचंदानी-आर्यवीर सेहवाग व मनल चौहान-मोहित उल्वा यांच्या भागीदारीच्या बळावर टीम इंडियाने गतवर्षीच्या अंडर-१९ संघाच्या पराभवाचा बदला घेत जेतेपदावर नाव कोरलं. गतवर्षी पाकिस्तान अंडर-१९ संघाने भारत अंडर-१९ संघाचा फायनलमध्ये पराभव केला होता.**

भारताला विजयासाठी १८ चेंडूत ३० धावांची गरज असताना मनल चौहान व मोहित उल्वा यांनी अर्धशतकी भागीदारी साकारत खेळत होते. पण ४८व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात मनल चौहान ४७ धावांवर झेलबाद झाल्याने भारताला मोठा धक्का बसला. यासह भारताने ९ विकेट्स गमावल्या होत्या, म्हणजे १ विकेट गमावली तर भारत सर्वबाद अशी स्थिती ओढवली. मोहित उल्वाने चौकार व षटकाराने ४९व्या षटकाची सुरूवात केली आणि यानंतर चिगुरूपति वेंकटाने चौकार लगावला, यासह या षटकात भारताने १७ धावा कुटल्या. आता भारताला विजयासाठी ६ चेंडूत ८ धावांची गरज होती. १-१ धाव काढत

पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना उस्मान खानच्या १०७ धावांच्या चर अब्दुल कादीरच्या झटपट ८० धावांच्या खेळीच्या बळावर ३३७ धावांचा डोंगर उभारला. पाकिस्तानच्या टॉप-५ फलंदाजांनी संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. तर प्रत्युत्तरात भारताने सावध व चांगली सुरूवात केली होती, पण पाकिस्तानच्या गोलंदाजीसमोर भारताने ठराविक अंतराने विकेट्स गमावल्या आणि अखेरच्या षटकांमध्ये ९ विकेट्स गमावले असतानाही मोहित उल्वा, मनन चौहान व चिगुरूपति वेंकट यांनी संघाला एका विकेटने विजय मिळवून दिला.

पाकिस्तानने दिलेल्या ३३८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने सावध सुरूवात केली. आर्यवीर सेहवाग व लक्ष्य रायचंदानी यांनी पहिल्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी केली. आर्यवीर सेहवागने शानदार ५८ धावांची खेळी केली, तर लक्ष्य रायचंदानीने ८० धावा केल्या. यानंतर विनीतने २४ धावांचं योगदान दिलं, तर अर्जुन राजपूतने १६ धावा केल्या. यानंतर अन्वय द्रविडने येताच ३ चौकार मारत त्याने १९ धावा केल्या, तितक्यात लक्ष्य रायचंदानी बाद झाला आणि पुढच्याच चेंडूवर अन्वय धावबाद झाल्याने संघावर पुन्हा एकदा दबाव आला.

त्यानंतर आर्यन व काव्य पटेल झटपट बाद झाले. पण मनल चौहान व मोहित उल्वा या जोडीने चौकार-षटकारांच्या मदतीने झटपट अर्धशतकी खेळी साकारली.

पाकिस्तानने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत धावांचा डोंगर उभारला. पाकिस्तानकडून सलामीवीर उस्मान व हयाम खान यांनी पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. उस्मान खानने या सामन्यात ११ चेंजूत ११ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने १०७ धावांची उत्कृष्ट खेळी साकारली. यानंतर अब्दुल कादीरने ५४ चेंडूत ३ चौकार व तब्बल ८ षटकारांसह वेगवान ८० धावा केल्या आणि संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मोलाची भूमिका बजावली. अब्दुल व उस्मानने दुसऱ्या विकेटसाठी १३५ धावांची भागीदारी केली.



यानंतर आलेल्या कर्णधार फरहान युसूफने ६० चेंडूत ६३ धावा केल्या. अहमद हुसैनने १७ धावांचं योगदान दिलं आणि यानंतर इतर सर्व फलंदाज झटपट माघारी परतले. पाकिस्तानने काव्य पटेलने ४ विकेट्स आणि चिगुरूपति व्येंकटा याने ३ विकेट्स घेतल्या. याशिवाय अर्जुन राजपूतने १ विकेट घेत योगदान दिलं.

# हॉटेल वैशाली, रूपालीचे परवाने निलंबित!

## सुधारणा होईपर्यंत व्यवसाय बंद : पार्सल, होम डिलिव्हरी करता येणार नाही

**महाईन्यूज । पुणे**

**पुणेकरांच्या खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या फर्ग्युसन रस्त्यावरील (एफसी रोड) प्रसिद्ध हॉटेल वैशाली आणि रूपाली रेस्टॉरंटचे अन्न व्यवसाय परवाने अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) तातडीने निलंबित केले आहेत. स्वयंपाकघरातील अस्वच्छता, अन्नपदार्थांची असुरक्षित साठवणूक, कच्चे आणि शिजवलेले अन्न एकत्र ठेवणे, तसेच स्वच्छतागृहांच्या लगत अन्नपदार्थ तयार करण्याची व्यवस्था अशा गंभीर त्रुटी तपासणीत उघड झाल्या आहेत. त्यामुळे दोन्ही आस्थापनांना सुधारणा होऊन एफडीएकडून लेखी परवानगी मिळेपर्यंत अन्नपदार्थांची विक्री, पार्सल आणि घरपोच सेवा करता येणार नाही.**




अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत १३ नोव्हेंबर रोजी दोन्ही हॉटेलांची तपासणी करण्यात आली. अन्न सुरक्षा मानकांचे गंभीर उल्लंघन झाल्याचे आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

वैशाली हॉटेलच्या तपासणीत ९८ पैकी केवळ ५८ गुण मिळाले. त्यामुळे आस्थापनेची नोंद नियमांचे पालन न करणारी (नॉन-कम्प्लायन्स) अशी करण्यात आली. स्वयंपाकघरात जागेची कमतरता असल्याने कच्चा माल ठेवण्याचा फ्रीजर महिलांच्या स्वच्छतागृहाच्या लगत, तर डोसा आणि उत्तप्पा तयार करण्याचा तवा पुरुषांच्या स्वच्छतागृहाच्या शेजारी ठेवण्यात आला होता. धुतलेली भांडीही स्वच्छतागृहासमोरील टेबलावर ठेवण्यात आली होती. उकडलेले बटाटे, शिजवलेला भात आणि अन्य तयार अन्नपदार्थ उघड्या कॉरिडॉरमध्ये ठेवले होते.

इडली-डोशाचे पीठ तयार करण्याची प्रक्रियाही असुरक्षित जागेत सुरू होती. कच्च्या भाज्या तयार अन्नपदार्थाच्या वर ठेवल्याने अन्न दूषित होण्याचा धोका होता. याशिवाय कीटकप्रतिबंधक दरवाजे, अन्नपदार्थांच्या तापमानाच्या नोंदी, पिण्याच्या पाण्याचा अद्ययावत तपासणी अहवाल आणि 'फॉस्टॅक' प्रशिक्षित पर्यवेक्षकाची उपस्थिती नसल्याचे आढळले. विशेष म्हणजे, जून २०२६ मध्येही तपासणी करून सुधारणा करण्याची नोटीस देण्यात आली होती. मात्र, त्रुटी कायम राहिल्याने परवाना निलंबित करण्यात आला.

रूपाली रेस्टॉरंटच्या तपासणीत स्वयंपाकघर उघडे आणि असुरक्षित असल्याचे दिसून आले. त्यामुळे धूळ, घाण आणि कीटकांचा प्रवेश होण्याची शक्यता होती. परिसरात पाणी साचणे, अपुरी स्वच्छता आणि कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आढळले. कच्चा माल, अर्धप्रक्रियायुक्त आणि तयार अन्नपदार्थ योग्य प्रकारे झाकून ठेवलेले नव्हते. त्यावर लेबल आणि वापरण्याची अंतिम तारीखही नमूद केली नव्हती. कच्चे आणि तयार अन्न वेगळे ठेवण्याची व्यवस्था, तापमान नियंत्रणाच्या नोंदी, अन्न सुरक्षा व्यवस्थापन आराखडा (एफएसएमएस), प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) आणि प्रशिक्षणाच्या नोंदींचाही अभाव होता.

### सुधारणा होईपर्यंत व्यवसाय बंद

सहआयुक्त श्रीकांत आर. करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पदनिर्देशित अधिकारी तथा सहायक आयुक्त सय्यद इम्रान हाश्मी यांच्या आदेशानुसार दोन्ही आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. संबंधित हॉटेलांनी सर्व त्रुटी दूर केल्यानंतर एफडीएकडून पुनर्तपासणी केली जाईल. अन्न सुरक्षा मानकांची पूर्तता झाल्याची खात्री करून विभागाची लेखी परवानगी मिळाल्याशिवाय अन्नपदार्थांची विक्री, पार्सल किंवा होम डिलिव्हरी सुरू करता येणार नाही.

# स्मशानभूमींच्या सुविधांसाठी महापालिकेचा खासगीकरणाचा घाट

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेने शहरातील स्मशानभूमींमधील सुविधांच्या खासगीकरणाचा घाट घातला असून, पहिल्या टप्प्यात वैकुंठ आणि बिबवेवाडी स्मशानभूमीतील विद्युत यंत्रणांची जबाबदारी खासगी संस्थेकडे सोपविण्यात येणार आहे. यासाठी वस्तू व सेवा करासह ९९ लाख ५१ हजार रुपये खर्च केले जाणार आहेत. महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.**



स्मशानभूमीतील आवश्यक सोयीसुविधांसाठी महापालिकेने स्वतःची स्वत:ची सक्षम यंत्रणा उभी करणे आवश्यक असताना आता खासगी संस्थेवर अवलंबून राहण्याचा पर्याय पालिकेने स्वीकारला आहे. महापालिकेने घेतलेल्या या निर्णयाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. महापालिकेच्या परिमंडळ क्रमांक पाच अंतर्गत वैकुंठ, बिबवेवाडी स्मशानभूमीतील विद्युत सुविधांची देखभाल, संचालन, आवश्यक मनुष्यबळाची उपलब्धता आणि दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवण्याची जबाबदारी आता खासगी संस्थेकडे दिली जाणार आहे.

या संदर्भात स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले म्हणाले, 'स्मशानभूमीतील विद्युत सुविधा ही अत्यावश्यक सेवा आहे. त्याच्या देखभाल आणि दुरुस्तीमध्ये कोणताही खंड पडू नये, यासाठी खासगी संस्थेची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने ठेवला होता. त्यासाठी ९९ लाख ५१ हजार रुपये खर्चाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.'या कामासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने ९५ लाख ४७ हजार ७७४ रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले.

विद्युत विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी १८ मे २०२६ रोजी त्याला मान्यता दिली. त्यानंतर महापालिका आयुक्तांनी २० मे २०२६ रोजी निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता दिली. स्मशानभूमीतील विद्युत यंत्रणा अखंडित सुरू राहणे आवश्यक आहे. मात्र, यासाठी खासगी संस्थेची नियुक्ती करताना पालिकेच्या स्वतःच्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याची तसदी का घेण्यात आली नाही, असे विचारले जात आहे.

नागरिकांना स्मशानभूमीसारखी आवश्यक मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी खासगी संस्थांकडे देण्यात आली, तर स्मशानभूमीत दु:खाच्या प्रसंगांत आवश्यक संवेदनशीलता संबंधित यंत्रणेकडून जपली जाईल का, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. या ठिकाणी पाणी, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, अंत्यसंस्कारासाठी आवश्यक यंत्रणा आणि कर्मचाऱ्यांची उपलब्धतेला विशेष महत्त्व आहे.

अंत्यविधीसाठी आलेल्या कुटुंबाला आणि त्यांच्या नातेवाईकांना आधीच दुःखाचा सामना करावा लागत असताना, तेथे त्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी खासगी संस्थेला नेमके कुठले निकष लावले जाणार आहेत, हे येत्या काळातच स्पष्ट होणार आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष भिमाले म्हणाले, स्मशानभूमीतील विद्युत सुविधा ही अत्यावश्यक सेवा आहे. त्याच्या देखभाल आणि दुरुस्तीमध्ये कोणताही खंड पडू नये, यासाठी खासगी संस्थेची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने ठेवला होता. त्यासाठी ९९ लाख ५१ हजार रुपये खर्चाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

# स्वीकृत नगरसेवक निवडीचा तिढा सुटणार?

## राष्ट्रवादीची तीन नावे निश्चित, भाजपाकडून सात नावे आठवडाभरात सादर होण्याची शक्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील दहा स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा सुमारे दहा महिन्यांपासून रखडलेला प्रस्ताव २० नोव्हेंबरच्या तहकूब सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या तीन उमेदवारांची नावे निश्चित केली असून, सत्ताधारी भाजपकडून उर्वरित सात जागांसाठी याच सभेत नावे सादर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजप कोणाला संधी देणार आणि नियुक्त्यांवर याच सभेत शिक्कामोर्तब होणार का, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.**




महापालिका निवडणुकीत भाजपने ८४, तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३६ जागा जिंकल्या होत्या. या संख्याबळानुसार स्वीकृत नगरसेवकांच्या दहा जागांपैकी भाजपला सात आणि राष्ट्रवादी काँग्रेसला तीन जागांवर संधी मिळण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने माजी स्थायी समिती अध्यक्षा सीमा सावळे, राजेंद्र जगताप आणि फजल शेख यांची नावे निश्चित केली आहेत. भाजपची सात नावे अद्याप जाहीर झालेली नाहीत.




स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा विषय गेल्या दहा महिन्यांत विविध कारणांनी पुढे ढकलला गेला. त्यामुळे इच्छुकांसह राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही नाराजी व्यक्त झाली होती. राष्ट्रवादीने निश्चित केलेल्या नावांमध्ये बदल व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचीही चर्चा होती. आता नियुक्तीचा प्रस्ताव सभेच्या मंजुरीसाठी येत असल्याने इतके दिवस प्रलंबित राहिलेल्या निवडीचा निर्णय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा प्रस्ताव महापालिका सभेपुढे मान्यतेसाठी असून, त्यावर नियमानुसार निर्णय घेतला जाईल, असे भाजपचे सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले. यासंदर्भात पक्षपातळीवर चर्चा होऊन निर्णय निश्चित झाला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

> महापालिका सभेत स्वीकृत नगरसेवक नियुक्तीबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी आहे. त्यासोबत नियमानुसार योग्य निर्णय घेण्यात येणार आहे. पक्ष स्तरावर चर्चा करून निर्णय निश्चित झालेला आहे.
>
> **– प्रशांत शितोळे, सत्तारुढ पक्षनेते. भाजपा.**



> स्वीकृत नगरसेवक पदांसाठी भाजपकडून नावे ठरवताना इच्छुकांचे संघटनात्मक काम, सामाजिक क्षेत्रातील योगदान आणि शहराच्या प्रश्नांवरील त्यांचा अनुभव विचारात घेतला जाईल. पक्षपातळीवरील निर्णयानुसार ही नावे महापालिकेकडे सादर केली जातील.
>
> **– शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा.**

# कृष्णा नाईक यांची मोशीतील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला भेट!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारत, नेपाळ आणि भूतानमध्ये सुमारे २३ हजार किलोमीटरचा पायी प्रवास करणारे म्हैसूरचे ३० वर्षीय योग अभ्यासक कृष्णा नाईक यांनी शनिवारी मोशीतील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला भेट दिली. यावेळी त्यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती शिल्पाचे पूजन करून महाराजांच्या चरणी नमन केले. मोशीतील तपोवन भूमीत श्री नागेश्वर महाराजांच्या नंदादीपाचेही त्यांनी दर्शन घेतले.**





या भेटीदरम्यान आमदार महेश लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी नाईक यांच्याशी त्यांच्या पदयात्रेतील अनुभव आणि पुढील योजनांबाबत संवाद साधला. "या प्रवासात अनेक चढ-उतार आले. प्रत्येक आव्हानातून नवा मार्ग शोधण्याची सवय लागली," असे नाईक यांनी सांगितले.

प्रवासात भेटलेली माणसे, वेगवेगळ्या प्रदेशांत आलेले अनुभव आणि त्यातून मिळालेली शिकवण पुस्तकातून मांडण्याचा नाईक यांचा मानस आहे. पदयात्रा पूर्ण झाल्यानंतर या प्रवासावरील माहितीपट प्रदर्शित करण्याचीही त्यांची योजना आहे. यासोबतच योग विषयात पीएच. डी. करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

मोशी सायकलिस्ट ग्रुपच्या सदस्यांसह युवा उद्योजक नितीन घिगे, चेअरमन राहुल सस्ते, गणेश गुरव, सचिन वहिले, विशाल टेकाळे, तुषार सस्ते, दत्तात्रय सस्ते आणि स्वप्नील भुमकर आदींच्या हस्ते नाईक यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना पुढील पदयात्रेसाठी शुभेच्छा दिल्या.

> या पदयात्रेत अनेक चढ-उतार आले. प्रत्येक आव्हानातून नवा मार्ग शोधायला शिकलो. वाटेत भेटलेली माणसं आणि त्यांच्याकडून मिळालेली शिकवण मला पुस्तकातून मांडायची आहे. यात्रा पूर्ण झाल्यावर या प्रवासावरचा माहितीपटही प्रेक्षकांसमोर आणण्याचा मानस आहे. मोशीतील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या चरणी नतमस्तक झालो. मोशीकरांनी केलेल्या सत्काराने पुढची वाट चालण्यासाठी नवं बळ मिळालं.
>
> **– कृष्णा नाईक, योग अभ्यासक, म्हैसूर.**

## भूमिका

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा पेच!



**कौटुंबिक जवळीक आणि राजकीय समीकरणे यांची सांगड घालताना शरद पवारांसमोर नेतृत्व, सत्ता आणि पक्षाच्या भवितव्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाच्या चर्चेतून नेमके काय साध्य होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. राजकारणात अनेकदा पराभवापेक्षा अनिर्णयाची अवस्था अधिक घातक ठरते.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार सध्या अशाच राजकीय पेचात अडकलेले दिसतात. अनेक दशकांच्या राजकीय अनुभवातून राज्याच्या राजकारणावर प्रभाव निर्माण करणाऱ्या पवारांसमोर आता पक्षाचे अस्तित्व टिकवण्यासोबतच नव्या नेतृत्वाची फळी उभी करण्याचे आव्हान आहे. एकेकाळी त्यांच्या शब्दावर राजकीय समीकरणे बदलणारे अनेक सहकारी आज वेगळ्या गटात आहेत. त्यातच अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली कौटुंबिक आणि राजकीय पोकळी परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवत आहे.

अलीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा पुन्हा सुरू झाली. शरद पवार यांच्या रुग्णालयातील उपचारादरम्यान प्रफुल्ल पटेल यांनी घेतलेली भेट, पार्थ पवार यांची सिल्व्हर ओकवरील उपस्थिती आणि त्यानंतर झालेल्या विविध नेत्यांच्या भेटीगाठींमुळे या चर्चांना वेग आला. मात्र, राजकीय भेटीगाठी म्हणजे विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. कारण या चर्चांबाबत संबंधित नेत्यांच्या विधानांमध्येच मोठी तफावत दिसते.

सुनील तटकरे यांनी अजित पवार हयात असते तर १२ फेब्रुवारीला दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण झाले असते, असे विधान केले. दुसरीकडे सुप्रिया सुळे यांनी विलीनीकरणाचा कोणताही प्रस्ताव आपल्यासमोर नसल्याचे स्पष्ट केले. अजित पवार यांच्या निधनानंतर सुरू असलेल्या चर्चा संपल्याचेही त्यांनी सांगितले. सुनेत्रा पवार यांनी योग्य वेळी सर्व गोष्टी स्पष्ट होतील, अशी भूमिका घेतली. त्यामुळे विलीनीकरणाबाबत नेमकी कोणाची भूमिका अधिकृत मानायची, हा प्रश्न कायम आहे.

यात सर्वांत महत्त्वाचा मुद्दा नेतृत्वाचा आहे. दोन्ही पक्ष एकत्र आले तर नेतृत्वाची सूत्रे कोणाकडे असतील? शरद पवार, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार की नव्या पिढीतील रोहित पवार? केवळ कौटुंबिक संबंध सुधारले म्हणून राजकीय मतभेद संपतील, असे नाही. दोन्ही गटांची विचारधारा, सत्तेतील सहभाग आणि भविष्यातील राजकीय दिशा यावर एकमत होणे आवश्यक आहे. भाजपसोबत सत्तेत राहायचे की महाविकास आघाडीसोबत विरोधी बाकावर बसायचे, हा मूलभूत प्रश्नही अनुत्तरित आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विलीनीकरणाचा निर्णय घेताना भाजपला विश्वासात घ्यावे लागेल, असे सूचक विधान केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा महायुती आणि एनडीएचा घटक असल्याने या निर्णयाचे परिणाम केवळ एका पक्षापुरते मर्यादित राहणार नाहीत. भाजपची भूमिका या प्रक्रियेत महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांच्या विधानातून स्पष्ट होते. त्यामुळे राष्ट्रवादीच्या अंतर्गत निर्णयांवरही सत्तेच्या राजकारणाचा प्रभाव राहणार आहे.

दरम्यान, दोन्ही शिवसेना एकत्र येण्याच्या चर्चांनाही काही नेत्यांच्या विधानांमुळे हवा मिळाली आहे. यावरून महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षीय पुनर्रचनेचे वारे वाहत असल्याचे चित्र आहे. मात्र, चर्चा आणि प्रत्यक्ष निर्णय यात मोठे अंतर असते. प्रत्येक पक्षाला आपले नेतृत्व, सत्ता आणि राजकीय अस्तित्व टिकवायचे आहे.

या सर्व घडामोडींमध्ये कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघातील राजकीय संघर्ष मात्र मागे पडला आहे. शासननियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याच्या निर्णयानंतर अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सत्ताधारी गटाला यश मिळाले. या प्रकरणावरून सरकारवर टीका होत असतानाच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेने राजकीय लक्ष दुसरीकडे वळवले.

शरद पवारांसाठी हा केवळ दोन पक्षांना एकत्र आणण्याचा प्रश्न नाही, तर राजकीय वारसा, नेतृत्व आणि भविष्यातील अस्तित्वाचा प्रश्न आहे. कौटुंबिक जवळीक आणि राजकीय हितसंबंध यांची सांगड घालणे सोपे नाही. त्यामुळे विलीनीकरणाच्या चर्चांपेक्षा ठोस भूमिका आणि स्पष्ट निर्णय महत्त्वाचे ठरणार आहेत. राजकारणातील डावपेचांनी काही काळ संभ्रम निर्माण करता येईल; मात्र जनतेला अखेर उत्तरदायित्व आणि स्पष्टता हवी आहे. पवार या गुंतागुंतीच्या राजकीय डावातून कोणता मार्ग निवडतात, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## प्रासंगिक »

# यशाची खरी ओळख

**एका गावात माधव नावाचा कुंभार राहत होता. त्याच्या हातून तयार होणारी मडकी बाजारात खूप प्रसिद्ध होती. एकदा राजवाड्यातून खास मडक्यांची मागणी आली. माधवने अनेक दिवस मेहनत घेऊन सुंदर मडकी तयार केली.**

मात्र, ती पोहोचवण्यापूर्वी त्याचा मुलगा म्हणाला, "बाबा, राजवाड्यातील लोकांना आपले नाव कळले पाहिजे. प्रत्येक मडक्यावर आपली सही करा."माधवने शांतपणे उत्तर दिले, "माझे नाव मडक्यावर असण्यापेक्षा ते वापरणाऱ्यांच्या मनात असणे महत्त्वाचे आहे." मडकी राजवाड्यात पोहोचली. काही दिवसांनी राजाने माधवला बोलावून घेतले. राजाने त्याच्या कामाचे कौतुक केले आणि विचारले, "तुझ्या कलेचे रहस्य काय?" माधव म्हणाला, "महाराज, प्रत्येक मडके तयार करताना मी त्याचा उपयोग करणाऱ्या माणसाचा विचार करतो. त्यामुळे माझ्या कामात दिखावा नसतो, तर जबाबदारी असते." राजाला त्याचे उत्तर खूप आवडले. त्याने माधवला सन्मानित केले.

- तात्पर्य : प्रसिद्धीपेक्षा कामातील प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेला अधिक महत्त्व असते.

निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने इस्रायलमध्ये सत्तास्थापनेचा संघर्ष तीव्र झाला आहे. अरब पक्षांची निर्णायक भूमिका, विरोधकांचे एकत्रित प्रयत्न आणि नेतान्याहू यांचे राजकीय डावपेच यामुळे नव्या सरकार स्थापनेचा मार्ग गुंतागुंतीचा बनला आहे.

# इस्रायलमध्ये सत्तेचा पेच; नेतान्याहूंच्या वर्चस्वाला आव्हान!



लोकशाही व्यवस्थेत निवडणुका म्हणजे केवळ सत्तांतराचे माध्यम नसून जनतेच्या अपेक्षा, नाराजी आणि बदलाची इच्छा व्यक्त करण्याचे प्रभावी साधन असते. इस्रायलमधील अलीकडील संसदीय निवडणुकीने याच वास्तवाचे दर्शन घडवले आहे. प्रदीर्घ काळ सत्तेत राहिलेले पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यासमोर विरोधकांनी मोठे आव्हान उभे केले. मात्र, कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने देशात सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला आहे.

इस्रायलच्या १२० सदस्यीय नेसेट संसदेत बहुमतासाठी ६१ जागांची आवश्यकता असते. निवडणुकीत नेतान्याहू यांच्या लिकूड पक्षाला २७, तर गादी आयझेनकोट यांच्या याशर पक्षाला २१ जागा मिळाल्या. नेतान्याहू यांच्या आघाडीला ५३, तर विरोधी आघाडीला ४८ जागांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे १९ जागा मिळवणाऱ्या अरब पक्षांचे महत्त्व वाढले आहे. त्यांच्या पाठिंब्यावर विरोधक बहुमताचा आकडा गाठू शकतात. राष्ट्रपती आयझॅक हर्झोग यांनी सरकार स्थापनेसाठी आयझेनकोट यांना संधी दिल्याने आता राजकीय हालचालींना वेग आला आहे.

या निवडणुकीचा निकाल हा नेतान्याहू यांच्या नेतृत्वावरील जनतेच्या विश्वासाची कसोटी मानला जात आहे. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्यामुळे इस्रायलच्या सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड झाल्या होत्या. त्यानंतर सुरक्षा अपयशाची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी विरोधकांनी सातत्याने केली. त्याचबरोबर नेतान्याहू यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप, न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेपाचे आरोप आणि धार्मिक गटांना दिल्या जाणाऱ्या विशेष सवलती हे मुद्देही निवडणुकीत चर्चेत राहिले. विशेषतः हरेदी समाजाला लष्करी सेवेतून मिळणाऱ्या सवलतींविरोधात वाढलेला असंतोष विरोधकांसाठी महत्त्वाचा ठरला.

या निवडणुकीतील सर्वांत लक्षवेधी बाब म्हणजे अरब पक्षांचे वाढलेले राजकीय महत्त्व. इस्रायलमध्ये अरब अल्पसंख्याकांचा राजकीय सहभाग आणि समान हक्कांचा मुद्दा अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. या निवडणुकीत त्यांच्या प्रतिनिधित्वाने सत्तेच्या समीकरणात निर्णायक स्थान मिळवले. मात्र, विरोधी आघाडीतील काही पक्षांना अरब पक्षांचा थेट सहभाग मान्य नसल्याने आयझेनकोट यांच्यासमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. इस्रायलला ज्यू लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून मान्यता देणे आणि हमासला दहशतवादी संघटना घोषित करणे अशा अटींमुळे चर्चांना अधिक गुंतागुंत निर्माण होऊ शकते.

दुसरीकडे नेतान्याहू सहजासहजी राजकीय मैदान सोडतील, असे मानणे चुकीचे ठरेल. विरोधी आघाडीतील मतभेदांचा फायदा घेऊन सत्ता टिकवण्याचा प्रयत्न ते करू शकतात. धार्मिक पुराणमतवादी पक्षांचा पाठिंबा मिळवणे किंवा व्यापक एकता सरकार स्थापन करणे असे पर्यायही राजकीय समीकरणात महत्त्वाचे ठरू शकतात.

इस्रायलसमोरील सध्याचा पेच हा केवळ सत्तास्थापनेपुरता मर्यादित नाही. सुरक्षा, आर्थिक स्थैर्य, पॅलेस्टिनी प्रश्न आणि देशातील सामाजिक एकात्मता अशी अनेक आव्हाने नव्या सरकारसमोर असतील. त्यामुळे केवळ आकड्यांचे गणित जुळवून सरकार स्थापन करणे पुरेसे ठरणार नाही. जनतेचा विश्वास संपादन करणेही तितकेच महत्त्वाचे असेल. नेतान्याहू यांचे राजकीय वर्चस्व कायम राहणार की विरोधकांच्या एकजुटीतून इस्रायलमध्ये नवे पर्व सुरू होणार, याचे उत्तर आगामी सत्तास्थापनेच्या घडामोडींमध्ये दडलेले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



म्हणवितों दास ।
मज एवढीच आस ॥१॥

परी ते अंगीं नाहीं वर्म ।
करीं आपुला तूं धर्म ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम?

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार सुप्रिया सुळेंनी स्पष्ट केली भूमिका

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चांना आता पूर्णविराम मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी केलेल्या स्पष्टीकरणांमुळे या संभाव्य एकत्रिकरणाची शक्यता जवळपास मावळली आहे.**





विलीनीकरणाबाबत पक्षातील आमदारांचे मत जाणून घेतले जात असल्याची जोरदार चर्चा राज्याच्या राजकीय वर्तुळात सुरू होती. मात्र, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी 'द इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना या वृत्ताचे स्पष्ट शब्दांत खंडन केले आहे. संभाव्य एकत्रिकरणाबाबत आपण आपल्या आमदारांकडून कोणतीही मते मागवलेली नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाकडून पहिल्यांदाच या विषयावर अधिकृत नकार आल्यामुळे, पक्षात यावर अंतर्गत चर्चा सुरू असल्याच्या अटकळांना तूर्तास ब्रेक लागला आहे.

तीन आठवड्यांपूर्वी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांना मोठे उधाण आले होते. विशेष म्हणजे, या महत्त्वाच्या बैठकीला सुनेत्रा पवार उपस्थित नव्हत्या. त्यानंतर पक्षाच्या अनेक नेत्यांनी असा दावा केला होता की, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार हयात असतानाच दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा निर्णय अंतिम झाला होता आणि फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात ही प्रक्रिया पार पडणार होती.






तीन दिवसांपूर्वी झालेल्या एका पत्रकार परिषदेत सुनेत्रा पवार यांनी सूचक विधान केले होते. "तुम्हाला एका वेगळ्याच विषयाबद्दल उत्सुकता आहे, हे मला माहीत आहे. पण वेळ आल्यावर सर्व गोष्टी स्पष्ट होतील," असे त्या म्हणाल्या होत्या. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा तर्कवितर्कांना उधाण आले होते.

### सुप्रिया सुळे यांची ठाम भूमिका

राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असून ऐन नोव्हेंबरमध्येच मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. मराठवाड्यातील ३७९ गावे आणि २४९ वाड्यांना मिळून ६०१ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये बीड जिल्ह्यात सर्वाधिक २९६ टँकर सुरू असून छत्रपती संभाजीनगरमध्ये १७९ आणि जालन्यात १०३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, महिलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

# पाळण्यातली मुलेही सुरक्षित नाहीत, वनमंत्री कुठे? वडेट्टीवारांचा संतप्त सवाल

**महाईन्यूज । नागपूर**

**शेतात काम करणारा शेतकरी असो, मजुरीसाठी जंगलालगत जाणारा मजूर असो किंवा घरात पाळण्यात झोपलेले लहान मूल, आता कुणाचाच जीव सुरक्षित राहिलेला नाही. वाघ आणि बिबट्यांचे हल्ले थेट मानवी वस्त्यांपर्यंत पोहोचले असून, निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत शेतकरी व शेतमजुरांच्या मृत्यूंचे सत्र सुरू असतानाच भंडारा जिल्ह्यात अवघ्या काही दिवसांत दोन चिमुकल्यांचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांत मृत्यू झाला. एवढी गंभीर परिस्थिती असतानाही वनमंत्री गणेश नाईक कुठे आहेत? त्यांना या घटनांची साधी दखलही घ्यावीशी वाटत नाही का, असा संतप्त सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.**



चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत मानव-वन्यजीव संघर्षाने गंभीर रूप धारण केले आहे. शेतात काम करणारे शेतकरी, शेतमजूर, जंगलात रोजगारासाठी जाणारे नागरिक वाघांच्या हल्ल्यांचे बळी ठरत आहेत. विशेष म्हणजे, आता वाघांचा वावर थेट गावांमध्ये आणि मानवी वस्त्यांच्या परिसरात वाढत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भंडारा जिल्ह्यातील अलीकडच्या घटनांनी या संकटाची भीषणता अधोरेखित केली आहे. ५ नोव्हेंबरला लाखांदूर तालुक्यातील दोनाड येथे पाच वर्षीय बालकाचा वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. त्यानंतर १३ नोव्हेंबरला पवनी तालुक्यातील तिर्री येथे घरात पाळण्यात झोपलेल्या आठ महिन्यांच्या बालकाला बिबट्याने उचलून नेले. या हल्ल्यात बालकाचा मृत्यू झाला. घराच्या चार भिंतींतही बालक सुरक्षित नसल्याची परिस्थिती या घटनेने समोर आणली आहे.

या घटनांवरून वडेट्टीवार यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना लक्ष्य केले. राज्यात वाघांच्या हल्ल्यांत सामान्य नागरिकांचे जीव जात आहेत. शेतकरी आणि मजुरांना शेतात जाणेही कठीण झाले आहे. वाघ थेट मानवी वस्त्यांमध्ये घुसून हल्ले करीत असताना सरकारकडून ठोस उपाययोजना का होत नाहीत? वनमंत्री नेमके कुठे आहेत आणि काय करीत आहेत? नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची नाही का, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. जंगलाचे रक्षण करणाऱ्या स्थानिक नागरिकांचाच जीव आज धोक्यात आला आहे. यात त्यांचा काय दोष? एखाद्या जंगली डुकराची शिकार झाली तर वनविभाग तातडीने दहा-दहा जणांवर कारवाई करतो. मग वाघांच्या हल्ल्यांत निष्पाप माणसांचे बळी जात असताना वन विभाग आणि सरकारची जबाबदारी कोण घेणार? लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याऐवजी सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी केला.

### नुकसान भरपाईने प्रश्न सुटणार नाही

मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी केवळ नुकसानभरपाई देऊन किंवा घटना घडल्यानंतर वन विभागाचे पथक पाठवून प्रश्न सुटणार नाही. वारंवार हल्ले होणाऱ्या गावांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना, वन्यप्राण्यांच्या हालचालींवर प्रभावी नियंत्रण आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी व्यवस्था उभारण्याची गरज आहे. मात्र, सरकारकडून त्यासाठी ठोस पावले उचलली जात नसल्याचा वडेट्टीवार यांचा आरोप आहे. वन्यजीवांचे संरक्षण महत्त्वाचे आहेच, पण त्यासाठी माणसांचे बळी किती दिवस दिले जाणार? वनमंत्र्यांनी आता आश्वासनांपलीकडे जाऊन कृती करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# शेख हसीना मायदेशी परतणार?

## भारताच्या दोन अटी; लष्करी विमानासह नव्या खटल्याची हमी आवश्यक!

**महाईन्यूज । बांगलादेश**

**बांगलादेशात २०२४ साली सरकारविरोधात झालेल्या निदर्शनांनंतर शेख हसीना यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला होता आणि त्यांना बांगलादेशातून पलायन करावं लागलं होतं. तेव्हापासून शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतलेला आहे. बांगलादेश भारताकडे शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी करत आहे आणि शेख हसीना यांनीही आपण डिसेंबरमध्ये मायदेशी परतणार असल्याचं जाहीर केलेलं आहे.**



या दरम्यान आता शेख हसीना यांना बांगलादेशात परतण्याबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. हसीना यांच्या परतीसाठी भारताने बांगलादेशासमोर दोन महत्वाच्या अटी ठेवल्याची माहिती समोर आली आहे. शेख हसीना भारतात आश्रयाला आल्यानंतर दोन वर्षांचा काळ लोटला आहे. आता हसीना या पुन्हा बांगलादेशात परतण्याच्या विचारात आहेत. मात्र, यासाठी भारताने तारिक रहमान यांच्या सरकारसमोर दोन अटी ठेवल्या आहेत.

बांगलादेशच्या सैन्याने स्वतः भारतात येऊन शेख हसीना यांना आपल्याबरोबर परत घेऊन जावं अशी भारताची इच्छा आहे. बांगलादेशने शेख हसीना यांना नवी दिल्लीतून परत आणण्यासाठी लष्करी विमान पाठवावं. तसेच यासह आणखी काही अटी भारताने ठेवल्या आहेत. कारण जुलै २०२४ च्या उठावादरम्यान आंदोलकांविरुद्ध केलेल्या कारवाईप्रकरणी बांगलादेशातील एका न्यायालयाने शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावलेली आहे.

पहिली अट काय? बांगलादेशच्या लष्कराने आपल्या देशाच्या सर्वाधिक काळ सत्तेत राहिलेल्या नेत्याला म्हणजेच शेख हसीना यांना परत नेण्याची जबाबदारी घ्यावी आणि त्यासाठी लष्करी विमानाचा वापर करावा. कारण ५ ऑगस्ट २०२४ रोजी देश सोडून भारतात येताना त्या बांगलादेशच्या लष्करी विमानानेच आल्या होत्या.

### मायदेशी परतण्याबाबत शेख हसीनांनी काय म्हटलं होतं?

काही दिवसांपूर्वी रॉयटर्स या वृत्तसंस्थेने घेतलेल्या एका मुलाखतीत शेख हसीना यांनी बांगलादेशात परतण्याबाबत भाष्य केलं होतं. शेख हसीना यांनी म्हटलं होतं की, मायदेशात माझ्या मृत्यूचा धोका आहे. पण तरीही आता देशात परतण्याची वेळ आली आहे. अवामी लीगचे अनेक नेते आणि त्या स्वतः मायदेशात परतणार असून न्यायालयासमोर उभं राहणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं होतं.

दुसरी अट काय? बांगलादेशने शेख हसीना यांना फाशीच्या शिक्षेविरुद्ध अपील करण्याची संधी द्यावी, तसेच जुलै २०२४ मधील हत्यांशी संबंधित आरोपांवर नव्याने खटला चालवण्याची हमी द्यावी अशा दोन अटी भारताने बांगलादेशासमोर ठेवल्या आहेत.

बांगलादेशच्या एका न्यायालयाने शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावलेली आहे. यावर बोलताना शेख हसीना यांनी म्हटलं होतं की, "जर माझा मृत्यू होणारच असेल तर तो माझ्या देशातील मातीतच व्हावा. माझ्या आई-वडिलांना तिथेच मरण आलं होतं. मी कारावासाच्या शिक्षेला घाबरत नाही. यापूर्वीही मी तुरुंगात गेलेली आहे. जर माझ्या सरकारकडून काही चुका झाल्या असतील तर त्याचा निर्णय न्यायालय किंवा विरोधी पक्ष नाही तर जनता घेईल. जेव्हा एखादं सरकार दीर्घकाळ सत्तेत राहतं, तेव्हा त्यांच्याकडून काही चुका होतात. मात्र त्या सरकारने काय चांगलं केलं आणि काय चुकीचं केलं, याचा निर्णय जनता घेईल."

# केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरींचा राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत अनेक राजकीय घडामोडी सुरू आहेत. विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये विविध मुद्यांवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असल्यामुळे दिल्लीत राजकारण चांगलंच तापलेलं आहे. असं असतानाच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे.**



मध्य प्रदेशातून राज्यसभेवर बिनविरोध निवडून आल्यानंतर आता मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी उत्तर प्रदेशातील राज्यसभेच्या आपल्या सदस्यत्वाचा शनिवारी राजीनामा दिला आहे. कारण काही दिवसांपूर्वी हरदीप सिंह पुरी यांची मध्य प्रदेशातून राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली होती.

राज्यसभेकडून या संदर्भात एक निवेदन जारी करण्यात आलं आहे. त्यानुसार, मंत्री हरदीप सिंह पुरी यांचा राजीनामा सभापतींनी आज (१४ नोव्हेंबर) स्वीकारला आहे. राज्यसभेच्या बुलेटिनमध्ये ही माहिती देण्यात आली आहे. बुलेटिनमध्ये म्हटलं आहे की, "उत्तर प्रदेशचे प्रतिनिधित्व करणारे राज्यसभेचे निवडून आलेले सदस्य हरदीप सिंह पुरी यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. हा राजीनामा राज्यसभेच्या सभापतींनी १४ नोव्हेंबर २०२६ रोजी स्वीकारला आहे."

दरम्यान, भाजपाने केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांना मध्य प्रदेशमधून राज्यसभेची उमेदवारी दिली होती. त्यानंतर या निवडणुकीत गेल्या आठवड्यात राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी इतर दोन उमेदवारांचे अर्ज फेटाळले गेले होते. त्यामुळे हरदीप सिंह पुरी हे एकमेव उमेदवार राहिले होते, त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झालेली आहे.

### हरदीप सिंह पुरी यांचा २५ नोव्हेंबरला संपणार होता कार्यकाळ

तामिळनाडूमध्ये भाजपाला बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री एल. मुरुगन यांनी १४ ऑक्टोबर रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक घेतली गेली. हरदीप सिंह पुरी यांचा उत्तर प्रदेशातील सध्याचा राज्यसभेचा कार्यकाळ २५ नोव्हेंबर रोजी संपणार होता. त्यामुळे पक्षाने केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांना मध्य प्रदेशमधून राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली होती. या निवडणुकीत ते बिनविरोध निवडून आले आहेत.

### कोण आहेत हरदीप सिंग पुरी?

हरदीप सिंग पुरी यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९५२ रोजी दिल्लीतील दर्यागंज येथे, निर्वासित कुटुंबात झाला. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या हिंदू कॉलेजमधून आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याच विद्यापीठातून राज्यशास्त्रात पदव्युत्तर पदवी (मास्टर्स डिग्री) मिळवली. महाविद्यालयीन काळात त्यांना विद्यार्थी राजकारणात विशेष रस होता. ते हिंदू कॉलेज पार्लमेंटचे 'पंतप्रधान' म्हणून निवडून आले होते. आयएफएस (IFS) मधून निवृत्त झाल्यानंतर हरदीप सिंग पुरी यांनी जानेवारी २०१४ मध्ये अधिकृतपणे भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. ऑगस्ट २०१७ मध्ये ते राज्यसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. सप्टेंबर २०१७ मध्ये त्यांची केंद्रीय मंत्रिमंडळात गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मे २०१९ मध्ये, त्यांना नागरी उड्डाण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. २०२० मध्ये ते उत्तर प्रदेशातून राज्यसभेवर बिनविरोध निवडून आले. जुलै २०२१ मध्ये त्यांची केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री तसेच गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

# एकता कपूरच्या नवा हॉरर चित्रपटाची पहिली झलक समोर

एकता कपूरचा नवा हॉरर चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. अमर बुटाला यांच्यासह एकताने 'हीरो की हॉररिन' या मोठ्या हॉरर चित्रपटाचे शीर्षक आणि फर्स्ट लूक पोस्टर समोर आणला आहे. साजिद खानच्या दिग्दर्शनातील या भयपटाची पहिली झलक फारच भयानक आहे. चित्रपटाच्या पहिल्या लूक पोस्टरमध्ये एका स्त्रीचा अतिशय भयानक आणि भयावह अवतार दिसत आहे. तिचे विस्कटलेले लांब केस, रक्ताने माखलेली लाल साडी, पांढरे डोळे, टोकदार सुळे आणि विद्रुप चेहरा अचानक प्रेक्षकांच्या समोर येताच अनेकांच्या काळजाचा ठोका चुकतो. मात्र या भयानक चेहऱ्यामागे नेमकी कोणती अभिनेत्री आहे? याबाबत कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. शोभा कपूर, एकता कपूर आणि अमर बुटाला यांच्या निर्मितीखाली बनत असलेला हा चित्रपट वर्ष



२०२७ मध्ये मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. जेव्हा महिन्याच्या १३ तारखेला शुक्रवारी येतो तेव्हा पाश्चिमात्य देशांत त्याला 'फ्रायडे द १३' म्हणतात. जुन्या मान्यतेनुसार हा दिवस अशुभ किंवा भीतीदायक मानला जातो. याच भीतीचा वापर करत निर्मात्यांनी शुक्रवार, १३ तारखेच्या दिवशी या भयपटाची पहिली झलक दाखवली आहे. त्यामुळे आता एकता कपूरच्या या हॉरर चित्रपटाची अनेकांना उत्सुकता लागली आहे. चित्रपटाच्या शीर्षकावरूनच यामध्ये भय आणि रहस्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत. विशेष म्हणजे, साजिद खान आणि एकता कपूर ही जोडी पहिल्यांदाच अशा मोठ्या हॉरर प्रोजेक्टसाठी एकत्र आल्याने चित्रपटाच्या कथानकाबरोबरच कलाकारांविषयीही प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.



# एका पोस्टने कंगना अडचणीत

अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रनौत पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. गांधी कुटुंबाबाबत सोशल मीडियावर केलेल्या काही पोस्टमुळे त्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. या पोस्टमधील वक्तव्ये प्रक्षोभक असल्याचा आरोप करत हिमाचल प्रदेशातील शिमला येथे त्यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आली आहे. एका निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने यासंदर्भात पोलिसांकडे तक्रार केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. कंगना रनौत आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे आणि वादग्रस्त विधानांमुळे नेहमीच चर्चेत असतात. अलीकडेच काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या पुस्तक प्रकाशनानंतर कंगना यांनी गांधी कुटुंबाबाबत सोशल मीडियावर अनेक पोस्ट केल्या होत्या. याच पोस्टवरून आता नवा वाद निर्माण झाला आहे. शिमला येथे राहणारे निवृत्त कॅप्टन अतुल शर्मा यांनी शुक्रवारी, १३ नोव्हेंबर रोजी कंगना यांच्याविरोधात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनंतर हिमाचल प्रदेश पोलिसांनी कंगना यांच्याविरोधात एफआयआर नोंदवली. कंगना यांच्या पोस्टमुळे सामाजिक शांतता भंग होण्याची शक्यता असून, वेगवेगळ्या गटांमध्ये तेढ निर्माण होऊ शकते, असा आरोप तक्रारदाराने केला आहे. तक्रारीनुसार, १० नोव्हेंबर रोजी कंगना यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून काही पोस्ट शेअर केल्या होत्या. या पोस्टमध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, त्यांचे पुत्र संजय गांधी आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या निधनासंदर्भात प्रक्षोभक स्वरूपाचे संकेत देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पोस्टमधील मजकुरावर तक्रारदाराने आक्षेप घेतला आहे. राजकीय टीका करण्याच्या मर्यादेपलीकडे जाऊन अशा प्रकारची विधाने करण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. कंगना यांनी सोनिया गांधी यांच्याबाबत केलेल्या विधानांवरही अतुल शर्मा यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तक्रारीनुसार, कंगना यांनी सोनिया गांधी यांना परदेशी नागरिक म्हणून संबोधत त्यांच्या राजकीय प्रवासाबाबत प्रश्न उपस्थित केले होते.



# बच्चन यांच्या बंगल्याच्या मालकी हक्काचा वाद

बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या जुहू येथील 'जलसा' बंगल्याच्या मालकी हक्कावरून कौटुंबिक वाद निर्माण झाला आहे. अमिताभ यांचे धाकटे बंधू अजिताभ बच्चन यांच्या पत्नी रमोला बच्चन यांनी १९९३ मध्ये करण्यात आलेल्या गिफ्ट डीडला आव्हान दिले आहे. या दस्तऐवजाद्वारे बंगल्याची मालकी जया बच्चन यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आली होती. मात्र, आपली माहिती किंवा संमती न घेता हा व्यवहार झाल्याचा दावा रमोला यांनी केला आहे. 'मुंबई मिरर'च्या वृत्तानुसार, रमोला बच्चन यांनी गेल्या सात महिन्यांत नोंदणी विभागाच्या अधिकाऱ्यांकडे अनेक तक्रारी दाखल केल्या आहेत. वादग्रस्त गिफ्ट डीड होण्यापूर्वी 'जलसा' बंगला आपल्या नावावर नोंदणीकृत होता, असा त्यांचा दावा आहे. विशेष म्हणजे, या मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत वेगवेगळ्या सरकारी आणि संस्थात्मक नोंदींमध्ये तफावत असल्याचे समोर आले आहे. 'कपोल हाउसिंग सोसायटी'च्या कागदपत्रांमध्ये जया बच्चन यांचे नाव मालक म्हणून नोंदवले आहे. मात्र, महाराष्ट्र सरकारच्या प्रॉपर्टी कार्डवर अद्याप रमोला बच्चन यांचे नाव असल्याचे सांगण्यात येत आहे. सरकारी नोंदींमधून आपले नाव हटवून जया बच्चन यांचे नाव नोंदवण्याचे प्रयत्न सुरू झाल्यानंतर हा वाद पुन्हा चर्चेत आला. १९९३ मध्ये तयार करण्यात आलेल्या गिफ्ट डीडच्या वैधतेवरही रमोला यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. हा दस्तऐवज साध्या कागदावर तयार करण्यात आला होता. त्यावेळी मुद्रांक शुल्क भरले नव्हते आणि त्यावर साक्षीदारांच्या सह्याही नव्हत्या, असे आरोप त्यांनी केले आहेत.

# सूर्यानं दाखवलं आपलं 'तेज'

## संघाबाहेर फेकल्या गेलेल्या सूर्याचा BCCI ला करावा लागणार पुन्हा विचार

महाईन्यूज । नवी दिल्ली

**भारताचा माजी टी २० कर्णधार सूर्यकुमार यादवने आपली सईद मुश्ताक अली ट्रॉफी मधील नवी इनिंग सुरू केली आहे. पुन्हा मुंबईचा कर्णधार झालेल्या सूर्यकुमार यादवने हैदराबादविरूद्धच्या सामन्यात २१ चेंडूत नाबाद ६० धावा करत एकप्रकारे निवडसमितीला एक संदेश दिला. या खेळीनंतर कामगिरीच्या कारणामुळे संघाबाहेर फेकल्या गेलेल्या सूर्याचा आता बीसीसीआयला पुन्हा विचार करावा लागण्याची शक्यता आहे. अर्थात यासाठी सूर्याला देखील आपल्या कामगिरीत सातत्य दाखवावं लागणार आहे.**



सामन्याबद्दल बोलायचं झालं तर जाधवपूर विद्यापीठ कॅम्पस ग्राऊंड २ मध्ये हा सामना सुरू होता. मुंबईसमोर हैदराबादने १७३ धावांचे आव्हान ठेवले होते. सूर्यकुमार यादव हा चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता. त्याने आपल्या इनिंगमध्ये ६ चौकार आणि ५ षटकार मारत मुंबईला १३.१ षटकातच विजय मिळवून दिला. त्याने अवघ्या १५ चेंडूत अर्धशतक ठोकलं. त्याने मुशीर खान सोबत तिसऱ्या विकेटसाठी २३ चेंडूत ६५ धावांची भागीदारी रचली.

युवा मुशीरने देखील अर्धशतकी खेळी केली. तो यंदाच्या हंगामात मुंबईकडून सलामीला फलंदाजी करत आहे. त्याने २४ चेंडूत ५१ धावा ठेकल्या. त्यात त्याने ६ चौकार आणि ३ षटकार ठकले. यापूर्वी मुशीरने हार्दिक तमोरेसोबत दुसऱ्या विकेटसाठी ४९ धावांची भागीदारी रचली होती. दरम्यान, शिवम दुबेने देखील आपला जवला दाखवत षटकार मारत मुंबईचा विजय शानदार केला. त्याने १४ व्या षटकात हा षटकार मारला. त्याने पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला येत ५ चेंडूत नाबाद १३ धावा केल्या आहेत.

सामन्याबद्दल बोलायचं झालं तर प्रथम फलंदाजी करणाऱ्या हैदराबादने २० षटकात सर्वबाद १७२ धावा केल्या. हैदराबादकडून अभिरथ रेड्डीने सर्वाधिक ३५ धावा केल्या. तर कोडिमेला हिमतेजा आणि चामा मिलिंद यांनी अनुक्रमे २५ आणि २२ धावा केल्या. मुंबईकडून मॅक्सवेल स्वामीनाथनने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तर शिवम दुबे आणि साईराज पाटील यांनी प्रत्येकी २ बळी टिपले.

मुंबईने हैदराबादचे १७२ धावांचे आव्हान १४ षटकात ३ फलंदाजांच्या मोबदल्यात पार केलं. मुंबईकडून कर्णधार सूर्यकुमार यादवने नाबाद ६० धावा केल्या तर मुशीर खानने ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली. शिवम दुबेने १३, अंगकृश रघुवंशी २७, हार्दिक तामोरे २२ धावा करत विजयात मोलाचा वाटा उचलला.

### मुंबईचा दणदणीत विजय!

या विजयामुळे मुंबईच्या फलंदाजांनी आक्रमक फलंदाजीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. विशेषतः सूर्यकुमार यादव आणि मुशीर खान यांच्या फटकेबाजीने हैदराबादच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच दबाव निर्माण केला. अवघ्या १४ षटकांत लक्ष्य गाठत मुंबईने आपल्या फलंदाजीची ताकद दाखवून दिली. सूर्यकुमारच्या झंझावाती अर्धशतकाने सामन्याचे चित्रच पालटले. या शानदार विजयामुळे मुंबईच्या संघाचा आत्मविश्वास निश्चितच उंचावला आहे. संपूर्ण सामन्यात मुंबईच्या फलंदाजांनी धावांचा वेग कायम राखत हैदराबादला पुनरागमनाची संधी दिली नाही. सांघिक कामगिरीच्या जोरावर मुंबईने हा सामना एकतर्फी करत दणदणीत विजयाची नोंद केली.

## डेव्हिड वॉर्नरचे क्रिकेट ऑस्ट्रेलियावर आरोप! खेळाडूंची नाव घेत उपस्थित केलं प्रश्नचिन्ह

महाईन्यूज । नवी दिल्ली

**ऑस्ट्रेलियन क्रिकेटमधील 'सँडपेपर गेट' (बॉल-टॅम्परिंग) प्रकरणात दिवसागणिक नवनवे खुलासे होत आहे. याचं कारण म्हणजे माजी खेळाडू उस्मान ख्वाजाने त्याच्या 'सब्र' (Sabr) या आत्मचरित्रात केलेल्या काही नवीन खुलाशांमुळे या प्रकरणाने पुन्हा जोर धरला. ख्वाजाने असा दावा केला आहे की, २०१८ च्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यादरम्यान घडलेल्या बॉल-टॅम्परिंगच्या घटनेबद्दल संपूर्ण ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाला माहिती होती.**



यावर वॉर्नरने त्याला पाठिंबा दिला, तर कमिन्सने हे दावे फेटाळून लावले आणि आता त्यानंतर वॉर्नरने तीन खेळाडूंची नाव घेत या वादादरम्यान झालेल्या चौकशीवर प्रश्न उपस्थित केला आहे.

उस्मान ख्वाजाने त्याच्या पुस्तकात केलेल्या दाव्यांवर डेव्हिड वॉर्नरने पाठिंबा दिला. यानंतर सध्याचा कसोटी कर्णधार पॅट कमिन्सने ख्वाजाचा हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला असून, तो निव्वळ निरर्थक असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान, या प्रकरणात बंदीचा सामना करत असलेल्या डेव्हिड वॉर्नरने सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमुळे 'क्रिकेट ऑस्ट्रेलिया'च्या तपासाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. १४ नोव्हेंबरच्या दुपारी, डेव्हिड वॉर्नरने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली. त्यात त्याने असं म्हटलं आहे की, "माझ्या माहितीनुसार, क्रिकेट ऑस्ट्रेलियाने २०१८ मधील चौकशीदरम्यान जोश हेजलवूड, नॅथन लायन आणि मिचेल स्टार्क यांची विचारपूस केली नव्हती. जर हे खरं असेल, तर गोलंदाजांना या प्रकाराची कोणतीही माहिती नव्हती, असा दावा क्रिकेट ऑस्ट्रेलिया कसा करू शकते? असं दिसतंय की सुरुवातीपासूनच कोणाला दोषी ठरवायचं, हे ठरवण्यात आलं होतं.

### वॉर्नरला क्रिकेट ऑस्ट्रेलियाचा त्वरित प्रतिसाद

वॉर्नरच्या दाव्यांना क्रिकेट ऑस्ट्रेलियाने त्वरित प्रतिसाद दिला. 'क्रिकइन्फो'ने दिलेल्या वृत्तानुसार, त्यांनी स्पष्ट केलं की, सुरुवातीच्या तपासणीदरम्यान सर्व खेळाडूंना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. इतकंच नव्हे, तर त्यानंतरच्या आठ वर्षांच्या कालावधीत त्यांना कोणताही नवीन पुरावा सादर करण्याची पुरेशी संधीही उपलब्ध होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 15 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

SCHOOL OF

LEGAL STUDIES

Learn Law. Lead Change.

**BA LLB (Hons)**
5 YEARS INTEGRATED PROGRAM

**BBA LLB (Hons)**
5 YEARS INTEGRATED PROGRAM



#2
(IIRF Rankings 2026)
Among New Age Private Universities- In Maharashtra

Moot Court & Practical Training

Legal Aid Support

ADMISSIONS OPEN 2026

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# स्पोर्ट क्लायम्बिंग चॅम्पियनशिपचा जल्लोषात शुभारंभ!

## राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपळे सौदागर येथील योगा उद्यानातील क्लायम्बिंग वॉलवर आयोजित करण्यात आलेल्या ३० व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लायम्बिंग चॅम्पियनशिप २०२६ या स्पर्धेचे उद्घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.**





या उद्घाटनप्रसंगी नगरसदस्य शत्रुघ्न बाप्पू काटे, नाना काटे, अनिता काटे, कुंदा भिसे तसेच देवांग नाईक, के. सरस्वती, श्रीकृष्ण कडुस्कर यांच्यासह देशाच्या विविध भागांतून सहभागी झालेले खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक, क्रीडाप्रेमी प्रेक्षक आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. महाराष्ट्र क्लायम्बिंग असोसिएशन आणि इंडियन माउंटेनियरिंग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. देशाच्या विविध भागांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून, त्यांना आपल्या कौशल्याचे आणि क्रीडा नैपुण्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळत आहे.

शहरात राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन होणे ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे. अशा स्पर्धांमुळे शहराची राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण होण्यास मदत होते, तसेच स्थानिक खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळते. पिंपळे सौदागर येथील जागतिक दर्जाच्या क्लायम्बिंग वॉलमुळे भविष्यात या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करण्यासाठीही निश्चितच पोषक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना देणे, उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी महापालिकेच्या वतीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांच्या आयोजनातून शहराच्या क्रीडा क्षेत्राच्या विकासाला अधिक गती मिळेल.

# मराठा सेवा संघाचे सुरेश पाटील राज्यस्तरीय 'समाजरत्न' पुरस्काराने सन्मानित

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**मराठा सेवा संघाचे क्रियाशील कार्याध्यक्ष सुरेश किसन पाटील यांना राज्यस्तरीय 'समाजरत्न नागरी पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्र यांच्या वतीने पंढरपूर येथे आयोजित १६व्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत पाटील यांचा गौरव करण्यात आला.**






> "माझ्या सामाजिक कार्याची दखल घेतल्याबद्दल महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषदेचा मी आभारी आहे. मराठा सेवा संघातील सहकाऱ्यांची साथ आणि कुटुंबाचा पाठिंबा या वाटचालीत मोलाचा ठरला. हा सन्मान मी त्या सर्वांसोबत वाटून घेतो. समाजासाठी अधिक जबाबदारीने काम करण्याचं बळ या पुरस्कारातून मिळालं आहे."
> - सुरेश पाटील, कार्याध्यक्ष, मराठा सेवा संघ, जळगाव.

पाटील यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन शिक्षक परिषदेने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली होती. परिषदेचे प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव जाधव यांच्या स्वाक्षरीने ८ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांना निवडपत्र देण्यात आले होते. पुरस्कार निवड समितीत परिषदेच्या प्रदेश आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. शनिवार, १४ नोव्हेंबर रोजी पंढरपूर (जि. सोलापूर) येथील पुणे रोडवरील श्रीराम मंगल कार्यालयात पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. सोहळ्यास महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषदेचे प्रदेश मुख्य संघटक मनोजकुमार रणदिवे आणि नाशिकचे प्रदेश संघटक माधव भुजाडे उपस्थित होते.

सुरेश पाटील हे जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात मराठा सेवा संघाचे क्रियाशील कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. राष्ट्रीय खेळाडू आणि महावितरणच्या सेवेतून निवृत्त झालेले आहेत. पुनावळे, पिंपरी-चिंचवड, पुणे येथील डी. एस. के. कुंजबन सोसायटीचे उपाध्यक्ष संजय पाटील यांचे ते वडील आहेत.

# लोणावळ्यातील जुन्या पोलिस ठाण्यावर दगडफेक

## बंद असलेल्या पोलिस ठाण्याची अज्ञात व्यक्तीकडून तोडफोड, पुन्हा कार्यान्वित करण्याची तयारी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**लोणावळा शहरातील जुन्या पोलिस ठाण्यावर अज्ञात व्यक्तीने दगडफेक करत अधिकारी कक्षाच्या काचा फोडल्या आहेत. 6 जुलै रोजी लोणावळा शहरात मोठ्या प्रमाणात पूर आला होता. त्या पुराचा फटका पोलिस ठाण्यालादेखील बसला. पोलिस ठाण्यातदेखील पाणी घुसल्याने लोणावळा बाजारातील पोलिस ठाण्याचे नवीन इमारतीमध्ये स्थलांतरण करण्यात आले होते. तेव्हापासून बाजार भागातील पोलिस ठाणे हे रिकामे होते. त्याठिकाणी पोलिस नाहीत याचा अंदाज घेत कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पोलिस ठाण्यावर दगडफेक करत अधिकारी कक्षाच्या काचा फोडल्या आहेत.**



लोणावळा बाजार भागातील वाहतूक कोंडी व त्या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या निमित्ताने जुने पोलिस ठाणे हे पुन्हा कार्यान्वित करत त्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी नियुक्त करणार असल्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक महेश विधाते यांनी सांगितले होते. मागील दोन तीन महिन्यांपासून पोलिस ठाणे हे रिकामी असल्यामुळे त्याची साफसफाई व स्वच्छता करत लवकरात लवकर ते पुन्हा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

लोणावळा शहरात ६ जुलै रोजी मोठ्या प्रमाणात पूरस्थिती निर्माण झाली होती. या पुराचा फटका शहरातील अनेक भागांना बसला होता. यामध्ये बाजारपेठ परिसरातील जुन्या पोलीस ठाण्याचाही समावेश होता. पुराचे पाणी पोलीस ठाण्याच्या इमारतीत शिरल्याने तेथील कामकाजावर परिणाम झाला. परिणामी, पोलीस प्रशासनाने या ठाण्याचे कामकाज नवीन इमारतीत स्थलांतरित केले. त्यानंतर बाजारपेठेतील जुनी पोलीस ठाण्याची इमारत वापराविना पडून होती. दरम्यान, या इमारतीमध्ये पोलीस अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित नसल्याची संधी साधून अज्ञात व्यक्तीने दगडफेक केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या दगडफेकीत अधिकारी कक्षाच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या आहेत. पोलीस ठाण्याची पाहणी केली असता हा प्रकार निदर्शनास आला. मात्र, ही तोडफोड नेमकी कोणी आणि कधी केली, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. लोणावळा बाजारपेठ परिसरात वाढणारी वाहतूक कोंडी, नागरिकांची सुरक्षा तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जुने पोलीस ठाणे पुन्हा सुरू करण्याचा निर्णय पोलीस प्रशासनाने घेतला आहे.

### ठाणे बंद असल्यामुळे पसरली

या अनुषंगाने पोलिस ठाण्याची पाहणी केली असता अधिकारी एक कक्षाच्या काचा कोणीतरी दगडफेक करून फोडल्याचे दिसून आले. सर्व कक्ष हे रिकामे पडल्यामुळे कचऱ्याने भरले आहेत. अधिकारी कक्षाच्या काचांवर ही दगडफेक नेमकी कोणी केली, याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसली तरी झालेली घटना ही निंदनीय आहे. पोलिस हे शहराचे व नागरिकांचे रक्षणकर्ते आहेत. त्यांच्यामुळेच शहरात कायदा व सुव्यवस्था राखली जाते. एखादे पोलिस ठाणे रिकामे आहे अथवा वापरात नाही म्हणून त्यावर दगडफेक करणे चुकीचा प्रकार आहे.

# दोन लाखांच्या वादातून रिक्षाचालकावर खंजीराने हल्ला!

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा उत्सव. मात्र, आर्थिक अडचणींमुळे समाजातील अनेक कुटुंबांना सणाचा आनंद मनमोकळेपणाने साजरा करता येत नाही. अशा गरजू कुटुंबांच्या घरातही आनंदाचा दीप उजळावा, या उद्देशाने विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी दापोडी परिसरातील गरजू कुटुंबांना दिवाळीनिमित्त किराणा सामान आणि सणाच्या साहित्याचे वाटप केले. विशेष म्हणजे, त्यांनी स्वतः कुटुंबांच्या घरी जाऊन मदतीचे साहित्य सुपूर्द केले आणि नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.**




सागर दत्ता बडे (वय २२, व्यवसाय रिक्षाचालक) असे जखमी तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार (दि. १३ नोव्हेंबर) रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास पीएमटी चौकातील नगरपरिषद इमारतीसमोरील कमानीजवळ ही घटना घडली.

सागर बडे हे आपल्या ताब्यातील ऑटो रिक्षा (एमएच १२ एलएम ४६०३) घेऊन व्यवसायासाठी थांबले होते. त्यावेळी आरोपी पिल्या ऊर्फ आर्यन नागोराव पंडित (वय २०), नव्या ऊर्फ नवनाथ जाधव (वय १९) आणि वैभ्या ऊर्फ वैभव व्यवहारे (वय २०) हे तिघे तेथे आले.

मुख्य आरोपीला दोन लाख रुपये रोख उसनवारीने दिले होते. मात्र, या पैशांच्या वादातून मनात राग धरून तिघांनी संगनमताने सागर यांच्याशी वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ व दमदाटी करत आरोपींनी हातातील लोखंडी खंजीर आणि धारदार शस्त्राने सागर यांच्या पोटावर, डोक्यावर तसेच शरीराच्या इतर भागांवर सपासप वार केले. या हल्ल्यात त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे पीएमटी चौक परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जखमी सागर बडे यांच्यावर उपचार सुरू असून या हल्ल्यामागील आर्थिक वाद हेच प्रमुख कारण असल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. आळंदी पोलिसांनी तिघा आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# Express
## Media Enterprises

**Professional Live set up with live drone available..**

- Documentary
- Weddings
- Drone
- Motion Graphics
- Testimonials
- Tutorial videos
- Product Videos
- Animation
- Social Media Content
- Promotional Videos
- Real Estate
- Corporate
- Advertising
- Events



**PUNE**

**Contact: 9657767000/9370493922/9664188046**